मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला मंजुरी

## 19.5 किमी नदीकाठ सुधारणा, एसटीपी, सुशोभिकरण आणि हरित पट्टा विकसित होणार; 7 जुलैला भूमिपूजन



### प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन

**» इंद्रायणी नदी पाणी लाखो वारकरी तिर्थ म्हणून प्राशन करतात. येत्या मंगळवारी (दि.7) देहू गावातून जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याचे आगमन आहे. त्या काळात इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचे भूमिपूजन व्हावे म्हणून त्या विषयाला ऐनवेळी मान्यता देण्यात आली आहे. त्या प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. इंद्रायणी नदीच्या एका बाजूने काम पिंपरी-चिंचवड महापालिका करणार आहे. तर, दुसऱ्या बाजूने पीएमआरडीएला काम करण्याच्या सूचना मंत्री माधुरी मिसाळ यांनी पूर्वीच दिल्या आहेत, असे स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन (सुधार) प्रकल्पास अखेर, मुहूर्त लागला आहे. इंद्रायणी नदीच्या एका बाजूच्या 19.50 किलोमीटर अंतराच्या प्रकल्पासाठी एकूण 430 कोटी 75 लाख 61 हजार 777 रुपये खर्चास स्थायी समितीने बुधवारी (दि.1) झालेल्या सभेत आयत्यावेळी मंजुरी दिली आहे. प्रकल्पाचे येत्या मंगळवारी (दि. 7) भूमिपूजन करण्यात येणार आहे. समितीची सभा अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली आज झाली. सभेला समितीचे सदस्य, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त, कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगर सचिव मुकेश कोळप व अधिकारी उपस्थित होते.

समितीसमोर या प्रकल्पाचा प्रस्ताव ऐनवेळी सादर करण्यात आला. या प्रकल्पास शासनाकडून अमृत 0.2 मधून मान्यता मिळाली आहे. प्रकल्पासाठी अर्धा खर्च केंद्र व राज्य सरकार देणार आहे. महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाने इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाची 443 कोटी 51 लाख 10 हजार रुपयांची निविदा 9 जानेवारी 2026 ला प्रसिद्ध केली होती. त्यात आठ ठेकेदारांनी सहभाग घेतला. त्यातील बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी, बीएसआर इन्फ्राटेक इंडिया, श्रीनिवासा कन्स्ट्रक्शन कॉ. प्रा. लि., इव्हायरो इन्फ्रा इंजि. लि. आणि केएमव्ही प्रोजेक्टस हे पाच ठेकादार अपात्र ठरले. तर, एलसी इन्फ्रा, एसएमसी इन्फ्रा व दिनेशचंद्र आर आगरवाल इन्फ्राकॉन हे तीन ठेकेदार पात्र ठरले.

त्यातील एलसी इन्फ्रा. प्रो. प्रा. लि.ची 3 टक्के कमी दराची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया योग्य प्रकारे राबवण्यात आली नाही, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे संदीप वाघेरे व शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी या प्रस्तावाला विरोध केला. त्यांचा विरोध नोंदवून 430 कोटी 75 लाख रुपये खर्चाला मंजुरी देण्यात आली. त्यातील निम्मा निधी केंद्र व राज्य सरकार महापालिकेस देणार आहे. तर, उर्वरित निम्मा खर्च महापालिका स्वत: करणार आहे.

# पालखी सोहळ्यासाठी देहू-आळंदी मार्गावरील वाहतुकीत बदल

## संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त देहू-आळंदी मार्गावरील वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत.



**पिंपरी | प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मंगळवारपासून (७ जुलै) सुरू होत आहे. मंगळवारी संत तुकाराम महाराजांची पालखी देहूतून तर श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी बुधवारी आळंदीतून आषाढी वारीसाठी प्रस्थान ठेवणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरासह देहू-आळंदी मार्गावर वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. हा बदल ४ ते ८ जुलैपर्यंत असणार आहे. प्रस्थान सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी देहू, आळंदी येथे वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

तुकोबारायांच्या पालखीचा पहिला मुक्काम देहूतील इनामदार वाडा येथे असून, बुधवारी (८ जुलै) हा सोहळा आकुर्डीतील विठ्ठल मंदिर येथे मुक्कामासाठी येणार आहे. तसेच माऊलींच्या पालखीचा पहिला मुक्काम आळंदीतीलच गांधी वाडा येथे असेल. त्यानंतर या दोन्ही पालख्या गुरुवारी (९ जुलै) पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होणार आहेत.

चिंबळी ते आळंदी रस्ता जड अवजड वाहनांसाठी बंद राहणार असून, चाकण ते आळंदी आणि चिंबळी फाटा चौक, चाकण येथून आळंदीकडे येणारी वाहने भारतमाता, पांजरपोळ, अलंकापुरम चौक मार्गे जातील. शेलपिंपळगाव, वडगाव घेणंद ते आळंदी या मार्गावरील वाहने चाकण-वडगांव घेणंद शेलपिंपळगाव मार्गे कोयाळी कमान, कोयाळी-मरकळगाव मार्गे जातील. मरकळ ते आळंदी या मार्गावरील वाहने मरकळकडून धानोरे फाटा मार्गे चऱ्होली फाटा – मॅगझीन चौक, अलंकापुरम चौक मार्गे जातील. भारतमाता चौक ते आळंदी या मार्गावरील वाहने मोशी चौक, पाजंरपोळ, अलंकापुरम चौक मार्गे, मोशी-चाकण-शिक्रापूर मार्गे जातील. विश्रांतवाडी ते आळंदी या मार्गावरील वाहने बोपखेल फाटा, दिघी मॅगझीन चौकाकडून अलंकापुरम चौक, चऱ्होली फाटा, मरकळमार्गे जातील.

आळंदी- देहू रस्त्यावरील तळेकर पाटील चौक (दक्षिणेस), वहिले पार्किंग, आदित्य शाळा, ज्ञानविलास महाविद्यालय डुडुळगाव जकात नाक्याजवळ, बोपदेव चौक, इंद्रायणी रुग्णालयासमोर (चाकण रोड), विश्रांतवाडी वडगाव रस्ता, आळंदी नगरपरिषद, पॉलिबॉण्ड कंपनीसमोर, प्लुमेरिया मंगल कार्यालय, बैलगाडा घाट चऱ्होली, मुक्ताई मंगल कार्यालयासमोर वाहतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

देहूगाव येथील गायरान मैदान, सीओडी मैदान (राधा कृष्ण मंगल कार्यालयाजवळ), खंडेलवाल चौक येथील माऊली वजनकाटा शेजारील मैदान, सप्तपदी मंगल कार्यालय, भगीरथी लॉन्स येथे वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# ‘पवना बंद जलवाहिनी’ प्रकल्प कालमर्यादित पूर्ण करा : आमदार शंकर जगताप

## विधिमंडळात ‘औचित्याच्या मुद्द्याद्वारे’ आग्रही मागणी, वार्षिक 1.29 टीएमसी पाण्याची होणार बचत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता, शहराच्या दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला ‘पवना बंद जलवाहिनी प्रकल्प’ विहित कालमर्यादेत आणि तातडीने पूर्ण करावा, अशी आग्रही मागणी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी गुरुवारी विधिमंडळात ‘औचित्याच्या मुद्द्या द्वारे’ केली. या रखडलेल्या प्रकल्पासाठी शासनाने विशेष निधी आणि आवश्यक प्रशासकीय मंजुऱ्या जलद गतीने उपलब्ध करून द्याव्यात, याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

आमदार शंकर जगताप यांनी सभागृहात शहराच्या पाण्याच्या प्रश्नावर बोलताना सांगितले की, पवना धरण ते निगडी सेक्टर-२३ जलशुद्धीकरण केंद्रादरम्यान सुमारे ३६ किलोमीटर लांबीची आणि १८०० मिमी व्यासाची बंद जलवाहिनी उभारण्यासाठी सन २००८ मध्ये ३९७.९२ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. मात्र, स्थानिक आंदोलन, जमीन संपादनातील अडचणी, प्रशासकीय व तांत्रिक अडथळे, तसेच विविध न्यायालयीन व लवाद प्रक्रियांमुळे हा प्रकल्प गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ रखडला आहे.



### वार्षिक १.२९ टीएमसी पाण्याची होणार बचत

**» आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले , सध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला पवना धरणातून दररोज सुमारे ५१० ते ५३० एमएलडी पाणीपुरवठा होतो. हा बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण झाल्यास खुल्या कालव्यातून आणि पात्रातून होणारे बाष्पीभवन, पाण्याची गळती व अनधिकृत पाणीउपसा पूर्णपणे रोखता येईल. यामुळे शहराला अतिरिक्त सुमारे १०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार असून, वार्षिक अंदाजे १.२९ टीएमसी पाण्याची मोठी बचत होईल. शहराचे भविष्यातील संभाव्य पाणीसंकट टाळण्यासाठी हा प्रकल्प गेमचेंजर ठरणार आहे.**

### १५ वर्षांत फक्त ४.५ ते ८ किमीचे काम!

**» या प्रकल्पावर आतापर्यंत सुमारे १७१ ते २०० कोटी इतका खर्च झाला असून, केवळ ४.५ ते ८ किलोमीटरपर्यंतचेच जलवाहिनीचे काम पूर्ण होऊ शकले आहे. तर सुमारे २८ ते ३२ किलोमीटरचे काम अद्याप प्रलंबित आहे. अनेक वर्षांच्या विलंबामुळे आणि वाढत्या बांधकाम खर्चामुळे या प्रकल्पाची सुधारित अंदाजित किंमत आता तब्बल १,२०० ते १,७०० कोटींवर पोहोचली आहे. हा वाढीव खर्च महापालिकेच्या आवाक्याबाहेर असल्याने शासनाने यासाठी विशेष आर्थिक मदत देणे गरजेचे आहे.**

**“पिंपरी-चिंचवडकरांना पुरेसे आणि हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यासाठी विशेष निधी मंजूर करावा आणि शासनाने एका निश्चित कालमर्यादेत हे काम पूर्ण करून घ्यावे, अशी मागणी मी केली आहे. या प्रकल्पाचा पाठपुरावा मी सातत्याने करत राहीन.”**

**- शंकर जगताप आमदार,**
**चिंचवड विधानसभा मतदारसंघ.**

---

# पाणीटंचाईमुळे खराळवाडीसह उपनगरांत टँकर मागणीत वाढ; दरात 60% पर्यंत वाढ

## अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; टँकरवर अवलंबित्व वाढले, महापालिकेकडे कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाने ओढ दिल्यामुळे महापालिकेने पाणीकपातीचा निर्णय घेतला असल्यामुळे खराळवाडी परिसरात टँकरच्या मागणीत वाढ झाली आहे. गांधीनगर, खराळवाडी, नेहरूनगर, मोरवाडी आणि आसपासच्या भागांत पाणीपुरवठा अनियमित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या असून, नागरिक त्रस्त झाले आहेत

गांधीनगर, खराळवाडी, पिंपरी कॅम्प, डिलक्स चौक, वैशालीनगर, नानेकरचाळ, रमाबाईनगर भागात नळाला कमी दाबाने पाणी आणि अवेळी पाणी येत आहे. त्यामुळे सोसायट्यांना टँकर मागविण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. एका टँकरसाठी नागरिकांना दीड ते तीन हजार रुपये मोजावे लागत आहेत. स्थानिक रहिवाशांनी सांगितले, की पाणीपुरवठा सुरळीत झाल्यास टँकरची गरज भासणार नाही. मात्र, अनियमित वितरणामुळे नागरिकांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. अनेक सोसायट्यांना आठवड्यातून एक-दोन वेळा टँकर मागवावा लागत आहे.

दरम्यान, वाढत्या मागणीमुळे खासगी टँकरचालकांचीही चांगलीच चांदी झाली आहे. काही ठिकाणी टँकर वेळेवर उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना प्रतीक्षा करावी लागत आहे. पाण्याची वाढती मागणी आणि मर्यादित उपलब्धता यामुळे टँकरचे दर वाढले आहेत. त्यामुळे महापालिकेने पाणीपुरवठा व्यवस्थेचे नियोजन अधिक प्रभावी करावे, गळती रोखावी, कमी दाबाच्या भागात आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पिंपरी शहरातील सर्व उपनगरांत नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करावा, कमी दाबाच्या भागांत तातडीने तांत्रिक उपाययोजना कराव्यात, पाणीपुरवठ्यातील गळती व अडथळे दूर करावेत, टँकरवर अवलंबित्व कमी करण्यासाठी दीर्घकालीन जलव्यवस्थापन योजना राबवावी, एक दिवसाआड ऐवजी नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, कमी दाबाच्या भागांमध्ये तातडीने उपाययोजना कराव्यात, पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक निश्चित करून त्याचे पालन करावे, गळती व अनधिकृत जोडण्यावर कठोर कारवाई करावी, तक्रारींवर तातडीने प्रतिसाद देण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष कार्यान्वित करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



### दरात तीस ते साठ टक्के वाढ

**» पाणी ही मूलभूत गरज असून, नियमित पाणीपुरवठा न झाल्यास नागरिकांना टँकरच्या वाढत्या खर्चाचा आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे महापालिकेने या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे. पाणीटंचाईमुळे खासगी टँकरचे दर ३० ते ६० टक्क्यांपर्यंत वाढल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. शहरात १,००० लिटरच्या टँकरसाठी १५० ते १७० रुपये आकारले जात आहे. तर, १,२०० लिटरसाठी २५० ते ३००, २,५०० लिटरसाठी ५०० ते ९००, ५,००० लिटरसाठी १,००० ते १,८००, ६,००० लिटरसाठी १,२०० ते रु २,०००, १०,००० लिटरसाठी २,००० ते ३,००० आणि १,२००० लिटरच्या टँकरसाठी २,५०० ते ३,५०० रुपये आकारले जात आहे.**

# पुणे महापालिकेत होणार भरती!

## सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर; 'आयबीपीएस'ला प्राधान्य दिल्याने नगरसेवकांची नाराजी, पदोन्नतीनंतरच सरळसेवा भरतीचीही मागणी मान्य

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-१ ते वर्ग-३ संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवा पद्धतीने भरण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. यामुळे महापालिकेतील १३ अत्यावश्यक पदे भरली जाणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही भरती प्रक्रिया रखडली होती.

परीक्षा घेऊन ही भरती केली जाणार असून, ही परीक्षा घेण्यासाठी केवळ 'आयबीपीएस' या संस्थेलाच प्राधान्य देण्यात आल्याने सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. महापालिकेच्या विविध विभागांतील अत्यावश्यक १३ रिक्त पदे भरण्यासाठी 'आयबीपीएस' संस्थेमार्फत परीक्षा घेण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी ठेवला होता. हा प्रस्ताव मान्य झाल्याने ही पदे भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेऊन प्रश्न उपस्थित केले. 'महापालिकेचे नवीन भरती नियम अद्याप जाहीर का झाले नाहीत, भरतीची परीक्षा घेण्यासाठी 'आयबीपीएस' आणि टीसीएस या दोन्ही नामांकित संस्थांचे पर्याय उपलब्ध असताना केवळ एकाच संस्थेला वारंवार संधी का दिली जात आहे,' अशी विचारणा त्यांनी केली.



### 'आयबीपीएस'वर नगरसेवकांचा आक्षेप

**» भरती परीक्षा घेण्यासाठी केवळ 'आयबीपीएस' या संस्थेलाच प्राधान्य देण्यात आल्याने सर्वसाधारण सभेत काही नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. टीसीएससारख्या अन्य सक्षम संस्थाही उपलब्ध असताना वारंवार एकाच संस्थेला संधी का दिली जाते, असा सवाल करण्यात आला. प्रशासनाने यापूर्वीच्या तीन भरती परीक्षा 'आयबीपीएस' मार्फत यशस्वीपणे पार पडल्याने सातत्य आणि अनुभव लक्षात घेऊन या संस्थेची निवड केल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र, भरती प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि स्पर्धात्मकता असावी, अशी मागणी नगरसेवकांनी केली.**

यावर खुलासा करताना सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त किशोरी शिंदे म्हणाल्या, 'यापूर्वीच्या तीन परीक्षा या 'आयबीपीएस' मार्फत घेण्यात आल्या. त्यामुळे या संस्थेला प्राधान्य देण्यात आले.' भरती नियम प्रक्रियेबाबत माहिती देताना उपायुक्त विजयकुमार थोरात म्हणाले, 'महापालिकेच्या भरती नियमांमध्ये काही तांत्रिक त्रुटी असून, त्या सुधारून आगामी सर्वसाधारण सभेत सुधारित नियम सादर केले जातील.'

महापालिकेत कार्यरत कर्मचाऱ्यांना ज्या पदांवर पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे, तिथे प्रथम पदोन्नती प्रक्रिया राबवावी आणि त्यानंतरच शिल्लक राहणाऱ्या रिक्त जागांवर सरळसेवा भरती घ्यावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी केली. महापालिकेच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेचा आणि हक्काचा विचार करणारी उपसूचना या वेळी मांडून मान्य करण्यात आली.

### कोणती पदे भरली जाणार?

**» महापालिकेतील वर्ग-१ ते वर्ग-३ संवर्गातील एकूण १३ अत्यावश्यक पदे सरळसेवा भरतीद्वारे भरली जाणार आहेत. वर्ग-१ मध्ये त्वचारोग तज्ज्ञ, एड्स मॉडेल अधिकारी, न्यूरोसर्जन, युरोसर्जन, रक्तसंक्रमण अधिकारी आणि उपमुख्य अग्निशमन अधिकारी या पदांचा समावेश आहे. वर्ग-२ मध्ये भूलतज्ज्ञ, जीवशास्त्रज्ञ, विभागीय अग्निशमन अधिकारी, सहायक विभागीय अग्निशमन अधिकारी, राजशिष्टाचार अधिकारी/उपनगरसचिव ही पदे भरली जातील. तर वर्ग-३ मध्ये सहायक माहिती व जनसंपर्क अधिकारी आणि मत्स्यालय पर्यवेक्षक/सहाय्यक या पदांसाठी भरती होणार आहे.**

### पदोन्नतीनंतरच सरळसेवा भरती

**» महापालिकेतील विद्यमान कर्मचाऱ्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी विरोधी पक्षनेते नीलेश निकम यांनी महत्त्वाची मागणी केली. ज्या पदांवर पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे, त्या पदांवर प्रथम विभागीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती द्यावी आणि त्यानंतरच उर्वरित रिक्त जागांसाठी सरळसेवा भरती प्रक्रिया राबवावी, असे त्यांनी सुचवले. सेवाज्येष्ठता आणि कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांचा विचार करणारी उपसूचना सभागृहाने मंजूर केली. त्यामुळे आगामी भरती प्रक्रियेत अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीलाही प्राधान्य मिळणार आहे.**

---

# पुण्यातील वाहतुकीचा वेग वाढणार! महापालिका आयुक्तांनी उचलले मोठे पाऊल...

## अनेक वर्षांपासून रखडलेल्या 'उच्च क्षमता द्रुतगती मार्गाला' (HCMTR) अखेर महापालिकेने गती दिली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाहतुकीला गती देण्यासाठी आणि रस्त्यांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत अडकलेल्या 'उच्च क्षमता द्रुतगती मार्गाला (एचसीएमटीआर) गती देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी सुटणार असून परिणामी वाहतुकीचा वेगही वाढणार आहे.

महापालिकेच्या १९८७ च्या विकास आराखड्यामध्ये (डिपी) ३४ किलोमीटर लांबीच्या एचसीएमटीआरची तरतूद करण्यात आली होती.



यासाठी वेगळ्या पद्धतीचे प्रयत्न प्रशासकीय पातळीवर करण्यात आले होते. मात्र त्यामध्ये प्रशासनाला योजना आल्याने हा प्रकल्प रखडलेला आहे. आता या मार्गासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सल्लागार नेमण्याचा विचार महापालिकेने सुरू केला आहे. त्याची बैठक महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतली. या बैठकीत या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाठी चार स्वतंत्र सल्लागार संस्थांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीमध्ये 'एचसीएमटीआर' प्रकल्पाचा आढावा आयुक्त राम यांनी घेतला. सल्लागाराच्या माध्यमातून या प्रकल्पाच्या वाहतूक, पर्यावरणीय आणि आर्थिक परिणामांचा अभ्यास केला जाणार आहे. या आढावा बैठकीला शहर अभियंता अनिरूद्ध पावसकर, प्रकल्प विभागप्रमुख दिनकर गोजारे, पथ विभागाचे मुख्य अभियंता राजेश बनकर यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

### काय आहे प्रकल्प?

**» शहरातील वाहतुकीचा वेग वाढविण्यासाठी महापालिकेने 'एचसीएमटीआर' मार्ग प्रस्तावित केला आहे. यासाठी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. बोपोडी, पुणे विद्यापीठ, सेनापती बापट रस्ता, पौड फाटा, कर्वे रस्ता, दत्तवाडी, सारसबाग, स्वारगेट, नेहरू रस्ता, लुल्लानगर, वानवडी, रामवाडी, मुंढवा, वडगाव शेरी, विमाननगर चौक व विश्रांतवाडी असा सुमारे ३५.९६ किलोमीटर लांबीचा आणि २४ मीटर रुंदीचा उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एचसीएमटीआर) दर्शविण्यात आला आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यातदेखील हा मार्ग दाखविण्यात आला आहे.**

# वारी मार्गावर महिला वारकऱ्यांना मिळणार ‘ही’ खास सुविधा

## 9 ते 11 जुलैदरम्यान पुणे शहरात दिवसातून 3 वेळा होणार सार्वजनिक स्वच्छता; कचरा संकलनासाठी दर 50 मीटरवर कंटेनर्स उपलब्ध.

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे ९ जुलै २०२६ रोजी पुणे शहरात आगमन होणार असून, दोन दिवसांच्या मुक्कामानंतर ११ जुलै रोजी सकाळी पालख्या पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहेत. या कालावधीत १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील सार्वजनिक रस्त्यांची स्वच्छता, क्रॉनिक स्पॉटची साफसफाई आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. संपूर्ण शहरात दिवसातून तीन वेळा सार्वजनिक स्वच्छता केली जाणार आहे.

पालखी मार्गावर प्रत्येक ५० मीटर अंतरावर कचरा संकलनासाठी सेवक व कचरा संकलनासाठी कंटेनर उपलब्ध राहतील. ९ ते ११ जुलैदरम्यान क्षेत्रीय कार्यालयांच्या मागणीनुसार पोर्टेबल व फिरती शौचालये उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यांची दिवसातून तीन वेळा स्वच्छता केली जाणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी, तसेच सार्वजनिक रस्त्यांवर कीटकनाशक व दुर्गंधीनाशक औषधांची फवारणी करण्यात येणार आहे.

सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेसाठी जेटिंग मशिनचीही व्यवस्था करण्यात आली आहे. भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत दोन्ही पालख्यांचा मुक्काम असल्याने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयातून किमान १० सफाई सेवक भवानी पेठ क्षेत्रात नियुक्त करण्यात येणार आहेत. पालखी मार्ग पुढे गेल्यानंतर मुक्कामस्थळावरील शाळा, धर्मशाळा, मंदिरे, तसेच संपूर्ण पालखी मार्गावर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महिला वारकऱ्यांच्या सुविधांना प्राधान्य देत पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने मुक्कामाच्या शाळांमध्ये शौचालये व स्नानगृहांची व्यवस्था केली आहे, तसेच वारी मार्गावर दर १.५ ते २ किलोमीटर अंतरावर महिलांसाठी शौचालये व स्नानगृह उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



### दिवसातून तीन वेळा स्वच्छता मोहीम

**» पालखी मार्ग आणि मुक्कामस्थळे स्वच्छ ठेवण्यासाठी महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांमार्फत विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. संपूर्ण मार्गावर दिवसातून तीन वेळा रस्त्यांची साफसफाई, कचरा उचलणे आणि क्रॉनिक स्पॉटची स्वच्छता केली जाणार आहे. प्रत्येक ५० मीटरवर कचरा संकलनासाठी कर्मचारी आणि कंटेनर उपलब्ध असतील. पालखी पुढे गेल्यानंतर शाळा, धर्मशाळा, मंदिरे आणि मुक्कामस्थळांची तातडीने स्वच्छता करून परिसर पूर्ववत केला जाणार आहे. यासाठी अतिरिक्त सफाई कर्मचारी आणि यंत्रसामग्रीही तैनात करण्यात येणार आहे.**

### आरोग्य सुरक्षेलाही प्राधान्य

**»‘वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महापालिकेने स्वच्छतेबरोबरच प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला आहे. मुक्कामस्थळे आणि पालखी मार्गावर कीटकनाशक तसेच दुर्गंधीनाशक औषधांची नियमित फवारणी केली जाणार आहे. सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता जेटिंग मशिनद्वारे करण्यात येईल. भवानी पेठेत दोन्ही पालख्यांचा मुक्काम असल्याने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयातून किमान १० सफाई कर्मचारी तेथे नियुक्त करण्यात येणार आहेत. वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण मिळावे, यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वयाने काम केले जाणार आहे.**

### २ हजार मोबाइल शौचालयांची सुविधा

**»आषाढी वारीदरम्यान लाखो वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी पुणे महापालिकेकडून पालखी मार्गावर २०० ठिकाणी तब्बल २ हजार मोबाइल शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. महिला वारकऱ्यांसाठी स्वतंत्र शौचालये आणि स्नानगृहांची सुविधाही उपलब्ध असेल. निवडुंगा विठोबा मंदिर, पालखी विठोबा मंदिर (भवानी पेठ) तसेच संबंधित क्षेत्रीय कार्यालयांमध्ये सॅनिटरी नॅपकिन्सची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. स्वच्छता आणि आरोग्याला प्राधान्य देत ही सुविधा उपलब्ध केली जात असून वारकऱ्यांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण मिळावे, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.**

# कल्याणीनगर ते विमानतळ मेट्रो मार्गाला मंजुरी

## लोहगाव विमानतळाला जोडणाऱ्या कल्याणीनगर-विमानतळ मेट्रो मार्गावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडून शिक्कामोर्तब.

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगाव येथील पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या कल्याणीनगर ते पुणे विमानतळ या नवीन मेट्रो मार्ग करण्यावर केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी बैठकीत शिक्कामोर्तब केले. यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सर्व मेट्रो मार्ग थेट विमानतळाला जोडले जाणार आहेत.

शिवाजीनगर येथील पुणे मेट्रो भवन येथे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत पुणे मेट्रो आणि पुणे महापालिकेच्या विविध प्रकल्पांबाबत आढावा बैठक पार पडली. या वेळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, महामेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ, विनोदकुमार अग्रवाल आणि शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर आदी उपस्थित होते.

पीसीएमसी ते भक्ती शक्ती चौक, रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी), खराडी- हडपसर- स्वारगेट- खडकवासला, नळ स्टॉप- वारजे- माणिकबाग आणि हडपसर ते लोणी काळभोर या मंजूर न झालेल्या मेट्रो मार्गिकांच्या प्रस्तावांची माहिती घेत, याबाबत केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करून प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मोहोळ यांनी दिले.

लोहगाव येथील पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या कल्याणीनगर ते पुणे विमानतळ या नवीन मेट्रो मार्ग करण्यावर केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी बैठकीत शिक्कामोर्तब केले. यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सर्व मेट्रो मार्ग थेट विमानतळाला जोडले जाणार आहेत.

मेट्रो स्टेशनवरून प्रवाशांना इच्छित स्थळी जाण्यासाठी लास्ट माइल कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी पीएमपीएमएल प्रशासनासोबत समन्वय साधून नियोजन करण्याचे आदेश दिले. पुण्याच्या वाहतुकीसाठी मेट्रो विस्तार आवश्यक आहे. नागरिकांच्या सूचनेनुसार मार्गांची पुनर्रचना करा, तांत्रिक मंजुरी आणि निधी कमी पडू देणार नाही, असे मोहोळ यांनी स्पष्ट केले.



### अहवाल तयार करण्याचे निर्देश

**» शहराभोवती ३६ किलोमीटर लांबीचा आणि २४ मीटर रुंदीचा एचसीएमटीआर वर्तुळाकार मार्ग उभारण्यावर अंतिम शिक्कामोर्तब झाले. प्रलंबित प्रकल्पाची निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे निर्देश मोहोळ यांनी महापालिका आयुक्तांना दिले. शहराच्या सर्व दिशांना मेट्रोचे जाळे निर्माण करण्यासाठी नियोजित शेवाळेवाडी- हडपसर- कात्रज या मार्गाचा विस्तार चांदणी चौक– वाकडपर्यंत करण्यात येणार आहे. या विस्तारित मार्गाचा नवीन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे निर्देश मोहोळ यांनी मेट्रो प्रशासनाला दिले.**